# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

-------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण १६, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री | |
| (३) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | |
| (४) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री | |
| (५) | अल्पसंख्यांक विकास, औकाफ, पणन मंत्री | |
| (६) | शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री | |
| (७) | अन्न व औषध प्रशासन मंत्री | |

-------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

-------------------------------------------

### राज्यातील शासकीय शाळा उद्योग समुह व स्वयंसेवी संस्थांना दत्तक देण्याबाबत

**(१) * २१२४१ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.सचिन अहिर, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ६५००० शासकीय शाळा असून, या शाळांचा पायाभूत विकास व्हावा यासाठी सुरुवातीला दहा वर्षांच्या मुदतीवर कॉर्पोरेट उद्योग समुह, स्वयंसेवी संस्था आदींना दत्तक देण्याचे प्रस्तावित असल्याचे मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी मुंबई येथे क्रांतीज्योती सावित्री फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराच्या शासकीय कार्यक्रमात दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार त्या माध्यमातुन शाळांच्या विकासासाठी उद्योग समूह व स्वयंसेवी संस्थांकडील “सीआरएस फंड” (कंपनी उत्तरदायित्व योजना निधी) निधीचा वापर करता येईल तसेच उद्योग समुहांना त्यांचे आवडीच्या नावाप्रमाणे शाळांच्या नावापुढे त्यांचे नाव देण्याचे प्रस्तावित असून त्यासाठीचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडून मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविण्यात आला असून शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच ग्रामीण भागातील शाळांना दत्तक शाळा योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचेही दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयामुळे सुमारे ६५००० शासकीय शाळा उद्योजक कंपन्या व खाजगी संस्थांना द्याव्या लागणार असल्याने सुमारे १५ हजार शाळा बंद कराव्या लागणार असताना त्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ राजीपर्यंत शासनाकडे सादर करण्याबाबतचे आदेश शिक्षण आयुक्त, पुणे यांनी शिक्षण उपसंचालकांना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बहुतांश शाळा प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा असून वय वर्षे १४ पर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे आहे व याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची असून शाळा दत्तक योजनेमुळे शासन आपल्या जबाबदारीपासून दूर जात असल्याने, सदर शासन निर्णयामुळे राज्यातील शासकीय शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांची मोठी हानी होणार असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचेही शैक्षणिक नुकसान होणार असल्याने या निर्णयास जनतेने, शाळा संघटनांनी व राजकीय पक्षांनी विरोध केला असून त्या विरोधात आंदोलन करुन निषेध नोंदविण्याचा इशारा देण्यात आल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या शासन निर्णयानुसार, खाजगी संस्थांनी शासकीय शाळांना दत्तक घेऊन त्या शाळांमध्ये आवश्यक संसाधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, यामुळे खाजगी संस्थांच्या दबावाखाली शासकीय शाळांमधील शिक्षकांना काम करावे लागेल, याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होईल या निर्णयामुळे राज्यातील शिक्षणव्यवस्था धोक्यात येईल व खाजगी संस्थांच्या ताब्यात जाईल, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, राज्य शासनाने शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांना दत्तक शाळा योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे काय, असल्यास, केव्हा व नसल्यास निर्णय केव्हापर्यंत अपेक्षित आहे, तसेच अशाच प्रकारची मागणी उद्योग समूह वा स्वयंसेवी संस्थांकडून राज्यातील विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये, रुग्णालये, एसटी बस स्थानके व अन्य शासकीय संस्थांबाबत करण्यात आल्यास शासनाचे धोरण काय राहणार आहे, त्याचप्रमाणे सीआरएस निधी संकल्पना थोडक्यात काय आहे,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर दत्तक शाळा योजनेबाबत घेण्यात आलेला निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) दत्तक शाळा योजनेमुळे शासन जबाबदारीपासून दूर जात आहे अथवा शिक्षक व विद्यार्थ्यांची हानी होत आहे ही बाब खरी नाही. योजनेबाबतच्या गैरसमजुतीतून काही घटकांकडून विरोध दर्शविणारी निवेदने प्राप्त झाली आहेत.
(५) देणगीदारांना त्यांनी दत्तक घेतलेल्या शाळेचे व्यवस्थापन, प्रशासन, संनियंत्रण व प्रचलित कार्यपध्दतीत कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही.
(६) दत्तक शाळा योजना राबविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १८/०९/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. अशा प्रकारची मागणी उद्योग समूह वा स्वयंसेवी संस्थांकडून इतर संस्थांबाबत प्राप्त झाल्यास तो तो मंत्रालयीन प्रशासकीय विभाग गुणवत्तेनुसार त्या त्या प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेऊ शकतो.

कंपनी अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार कॉर्पोरेट कंपन्यांना त्यांच्या निव्वळ नफ्याच्या दोन टक्के इतकी रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करणे आवश्यक आहे.
(७) व (८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-बंगलोर (जि.सातारा) या महामार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याबाबत

**(२) * २११६१ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-बंगलोर या महामार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्यांवरील टोलमध्ये दरवर्षी वाढ होत आहे, या महामार्गाची त्वरित दुरुस्ती करा अन्यथा या महामार्गावरील टोल नाके बंद करण्याचा इशारा येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ सप्टेंबर,२०२३ रोजी वा त्या सुमारास झालेल्या दिशा समितीच्या बैठकीत दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे-बंगलोर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरु केले आहे काय, उक्त कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे, तसेच या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे-बंगलोर या महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर महामार्ग केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो.

- प्रकल्प संचालक, एन.एच.ए.आय. कोल्हापूर यांनी कळविल्यानुसार रस्त्याच्या दुरावस्थेमुळे दिनांक ८/०९/२०२३ रोजी झालेल्या दिशा समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी टोलनाके बंद करण्याचा इशारा दिला होता, ही वस्तुस्थिती आहे.
- तथापि, सद्य:स्थितीत सदर महामार्ग सुस्थितीत असून त्याची वेळोवेळी दुरुस्ती व देखभाल करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम, २००८ व वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार कायदेशीररित्या टोल वसूली केली जात आहे.

(२) पुणे-बंगलोर महामार्गावरील पुणे ते कोल्हापूर या लांबीच्या सहा पदरीकरणाच्या एकूण लांबीपैकी पुणे ते सातारा या लांबीतील १३७ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले आहे.

तसेच सातारा ते कागल या १३२ कि.मी. लांबीमधील सहा पदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. या महामार्गावरील पुणे ते सातारा व सातारा ते कागल ही लांबी वाहतूकीस सुस्थितीत आहे. महामार्गाच्या दुरुस्ती व देखभालीचे काम कंत्राटदारामार्फत वेळोवेळी करण्यात येत आहे.
(३) प्रकल्पाचे काम करणारे कंत्राटदार रस्त्याच्या दुरुस्ती व देखभालीचे काम वेळोवेळी करत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील रिक्त पदे भरून ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारी निकाली काढण्याबाबत

**(३) * २२२०० श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्राहकांच्या हितासाठी व जिल्हा पातळीवर जिल्हास्तरीय ग्राहकांना न्याय मिळण्याकरीता राज्य व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य ग्राहक आयोग व जिल्हा पातळीवर ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारी तीन महिन्यात निकाली काढणे आवश्यक असतानाही अनेक वर्षे या तक्रारींचा निपटारा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे ६९,७९८ म्हणजेच ७० हजार तक्रारी प्रलंबित असून कोल्हापूर जिल्हा ग्राहक न्यायालयातील २५०० ते ३००० खटले निर्णयाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आयोगात अध्यक्ष, सदस्य व प्रबंधक अशी १९८ पदे रिक्त असल्याने वर्षानुवर्षे ग्राहकांच्या तक्रारी प्रलंबित असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून कोल्हापूर जिल्हा ग्राहक न्यायालयातील अध्यक्ष, सदस्य व प्रबंधक ही पदे भरण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री यांना दिनांक २६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने राज्य व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील रिक्त पदे तसेच कोल्हापूर जिल्हा ग्राहक न्यायालयातील अध्यक्ष, सदस्य व प्रबंधक ही पदे भरण्याबाबत तसेच राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरीता व प्राप्त झालेल्या तक्रारी निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

राज्य आयोगात दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ अखेर अध्यक्ष-२९, सदस्य-४३ व प्रबंधक-२७ अशी एकूण ९९ पदे रिक्त होती.

तसेच, सदर पदे भरण्याच्या अनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री तथा विधी न्याय मंत्री यांना देण्यात आलेले निवेदन प्राप्त झालेले नाही.

शासन निर्णय दिनांक ०५/१०/२०२३ अन्वये अध्यक्ष व सदस्य यांची रिक्त पदे भरण्यात आली आहेत. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दिनांक २०/१०/२०२३ च्या आदेशान्वये सदर प्रक्रिया रद्द केल्याने सदर आदेशाविरूध्द अध्यक्ष व सदस्य यांच्या केलेल्या नियुक्त्यांची वैधता कायम ठेवण्यासाठी राज्य शासनाकडून मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या बांधकामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(४) * २१५०९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या आर.सी.सी बांधकामामध्ये अनियमितता झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत कार्यालयाकडे सदरहू कामाचे अभिलेखे व मोजमाप पुस्तिकांची मागणी केली असता उक्त दोन्ही कागदपत्रे कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी गहाळ केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कामाची चौकशी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांचेकडे नागरिकांनी तक्रारी करुनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने उपरोक्त आर.सी.सी बांधकामाच्या अनियमिततेप्रकरणी दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

श्री.मनिष भगवानदास अग्रवाल यांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजी महिती अधिकार प्रश्नाधिन कामाबाबत माहिती मागविली होती. तथापि, याबाबत अर्जदाराने अपील केले असता दिनांक ०५/०७/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली असून अर्जदारास अपीलात आवश्यक माहिती देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणात माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये तक्रार प्राप्त असता मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, छ.सभांजीनगर यांनी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, छ.संभाजीनगर यांना

चौकशी करण्याबाबत कळविले असून त्या अनुषंगाने त्यांनी दिनांक ७/०७/२०२२ व दिनांक १/०९/२०२२ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात प्रश्नाधिन कामाच्या दुसऱ्या धावत्या देयकातील मोजमापे भौतिकदृष्ट्या जुळून येतात असा उल्लेख आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "आनंदाचा शिधा" वाटप करण्याकरीता विना निविदा कंत्राट देण्यात आल्याबाबत

**(५) * २१३८९ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गौरी-गणपतीच्या सणाला ४५० कोटी रुपयांचा "आनंदाचा शिधा" वाटप करण्याचा निर्णय घेऊन, त्याचे विना निविदा कंत्राट देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आनंदाचा शिधा या योजनेमध्ये अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने विना निविदाच कंत्राट देण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे, तसेच या आनंदाच्या शिधा वाटपाच्या निर्णयात पुढील काळात पारदर्शकता आणण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गौरी-गणपती उत्सवानिमित्त पात्र शिधापत्रिकाधारकांना विहित वेळेत "आनंदाचा शिधा" मिळावा याकरीता मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये आवश्यक शिधाजिन्नस संचांची खरेदी करण्याकरीता सन २०२३ च्या गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. सणांनिमित्त निविदेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या केंद्रीय भांडार, मुंबई या पुरवठादारासोबत करण्यात आलेल्या करारनाम्यास पुर्वीच्याच दराने मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील तुर्भे एमआयडीसीमधून कोटयवधी रुपयांची भेसळयुक्त लवंग जप्त करण्यात आल्याबाबत

**(६) * २१७७८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील तुर्भे एमआयडीसीमध्ये अन्नसुरक्षा विभागाने केलेल्या कारवाईत कोट्यवधी रुपयांची भेसळयुक्त लवंग जप्त करण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सणासुदीच्या काळात मसाल्याच्या पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याने जनतेचे आरोग्य धोक्यात येत असून याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शासनास दिलेल्या अहवालानुसार मसाला पदार्थामधील भेसळ रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयाने दिनांक २३/०८/२०२३ रोजी मे. रिशी आईस ॲन्ड कोल्ड स्टोरेज प्रा. लिमिटेड, डी/३५, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, तुर्भे, नवी मुंबई या आस्थापनेची तपासणी करून सदर कोल्ड स्टोरेज मध्ये मे. जी. टी इंडिया प्रा.लि, शॉप नं बी-५१, एपीएमसी मार्केट, फेज-२, सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई या अन्न आस्थापनेने साठविलेल्या “Clove Stem” या अन्नपदार्थाचे एकूण ०७ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले आहेत. विश्लेषणासाठी घेण्यात आलेले अन्न नमुने अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, बांद्रा मुंबई येथे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. विश्लेषण अहवाल प्राप्त होताच अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अन्वये नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त ठिकाणी आढळून आलेला “Clove Stem” या अन्नपदार्थाचा उर्वरित साठा मिथ्याछाप व कमी दर्जाचे असल्याचे संशयावरुन जप्त करण्यात्त आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील ‘पब्लिक पॉलिसी अभ्यासक्रमाच्या प्राध्यापकांचे प्रलंबित वेतन देऊन उक्त अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्याबाबत

**(७) * २१७०८ श्री.जयंत पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने पब्लिक पॉलिसी या अभ्यासक्रमाच्या तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे वेतन मागील ३ वर्षांपासून थकविल्यामुळे विद्यापीठाच्या पब्लिक पॉलिसी अभ्यासक्रमाची या वर्षाची प्रवेश प्रक्रिया प्रलंबित असून प्राध्यापकांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत ही प्रक्रिया सुरु होणार नसल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या दप्तर दिरंगाईमुळे पब्लिक पॉलिसी या अभ्यासक्रमाचे वर्ग बंद राहणार असल्याने इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी पब्लिक पॉलिसी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज सादर केले होते, मात्र विद्यापीठाकडून प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी अद्याप जाहीर करण्यात आली नसल्याने या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने पब्लिक पॉलिसी या अभ्यासक्रमाचे तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मागील ३ वर्षांपासून प्रलंबित असलेले वेतन अदा करण्याबाबत व उक्त अभ्यासक्रम प्रक्रिया सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३)  मुंबई विद्यापीठाकडून पब्लिक पॉलिसी हा अभ्यासक्रम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यात येतो. सन २०२३-२४ यावर्षी ह्या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे नवीन प्रवेश झाले नाहीत. सदर अभ्यासक्रमाकरीता तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या अध्यापकांचे प्रलंबीत वेतन तात्काळ अदा करण्याच्या सुचना मुंबई विद्यापीठाला देण्यात आल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) लागू नाही.

-----------------

## पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरतीसाठी बिंदूनामावलीतील त्रुटी दूर करून एनटी-सी प्रवर्गास आरक्षणानुसार जागा देणेबाबत

**(८) * २१३७५ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १९१६२ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शिक्षण क्षेत्रातील शिक्षक भरतीबाबत चुकीचे निर्णय रद्द करून आश्वासित केल्याप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षात ३०००० शिक्षक भरती करण्याची मागणी शिक्षकांकडून सातत्याने होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरतीसाठी बिंदूनामावली अद्ययावत करण्याबाबतचे शिक्षण आयुक्त यांचे दिनांक २० जुलै, २०२३ रोजीचे पत्र निर्गमित झालेले आहे, त्यामधील (ब) मध्ये बिंदूनामावली रोस्टरबाबत खुल्या प्रवर्गाच्या तक्रारी विचारात घेऊन ज्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत, त्याच पध्दतीने एनटी-सी प्रवर्गाचीही बिंदूनामावली तपासताना त्रुटी दूर केली जावी, यापूर्वीही शिक्षण आयुक्त कार्यालयास पत्रान्वये बिंदूनामावलीतील घोळ दूर करून एनटी-सी प्रवर्गाला ३.५ टक्के

आरक्षणानुसार जागा मिळणेबाबत दिनांक १८ मे,२०२३ रोजीचे निवेदन दिलेले आहे, परंतु अद्यापही त्यावर कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ मधील शिक्षक भरतीचा विचार करता किंवा त्यामागील भरतीमध्येही एनटी-सी आरक्षण ३.५ टक्के असूनही आरक्षणानुसार सदर प्रवर्गातील जागांची भरती केली जात नाही, त्याला कारण म्हणजे एनटी-सी प्रवर्गातील ज्या उमेदवारांची गुणवत्तेनुसार खुल्या गटात (open) मध्ये निवड होते, त्या जागांची नोंद रोस्टर तपासणीत जनरल मध्ये होण्याऐवजी एनटी-सी प्रवर्गामध्ये धरून बिंदुनामावली तपासली जाते, त्यामुळे एनटी-सी प्रवर्गातील जागांचा अनुशेष (रिक्त) राहण्याऐवजी अतिरिक्त दाखविल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषद भरती बिंदुनामावलीमधील अनियमिततेमुळे एनटी-सी प्रवर्गातील ३.५ टक्के प्रमाणे जागांचा अनुशेष शिल्लक असूनही अतिरिक्त जागा दाखविल्यामुळे एनटी-सी प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होत असून सर्व जिल्हा परिषद मधील एनटी-सी प्रवर्गाच्या बिंदूनामावली तपासणीतील त्रुटी दूर करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना योग्य आदेश देण्याची विनंती लोकप्रतिनिधी यांनी वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षण क्षेत्रातील शिक्षक भरतीबाबत चुकीचे निर्णय रद्द करुन चालू शैक्षणिक वर्षात ३०००० शिक्षक भरती करण्याबाबत तसेच सर्व जिल्हा परिषदमधील एनटी-सी प्रवर्गाच्या बिंदूनामावली तपासणीतील त्रुटी दूर करण्यासदंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षक भरतीबाबतचे चूकीचे निर्णय निर्गमित करण्यात आलेले नाहीत. तथापि, चालू शैक्षणिक वर्षात ३०,००० पदांची शिक्षक भरती करण्याची मागणी होत आहे.

(२) हे खरे नाही.

प्राप्त निवेदनानुसार कार्यवाही करणेकरीता सर्व जिल्हा परिषदांना आयुक्त स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे.

एनटी-सी प्रवर्गाचा अनुशेष असूनही त्या प्रवर्गाच्या जागा अतिरिक्त दाखविल्या जात आहेत, हे खरे नाही. परंतु एनटी-सी प्रवर्गाच्या बिंदुनामावलीतील त्रूटी दूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(५) सर्व जिल्हा परिषदांची बिंदुनामावली तपासून त्रूटी दूर करुन बिंदुनामावली अद्ययावत करणेबाबत शासन स्तर तसेच आयुक्त स्तरावरुन व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सर्व शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, सहाय्यक आयुक्त (मावक) यांना सूचना देण्यात आल्या असून, त्यानुसार बिंदुनामावली अद्ययावत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची ई-पडताळणी अपूर्ण असल्याबाबत

**(९) * २१०५२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १९४०१ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, अनुदानित शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी संच मान्यतेच्या प्रक्रियेसोबत विद्यार्थ्यांचे प्रवेश आणि उपस्थिती आदीसाठी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड ई-पडताळणी करुन ते अद्ययावत करण्याची मोहीम सुरु असल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उपनगर, मुंबई शहर व नागपूर विभागासह अन्य जिल्ह्यात, विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अवैध असल्याने आधारकार्ड पडताळणी अद्याप अपूर्ण असून सुमारे २० लाख ८० हजार विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची ई-पडताळणी अद्याप झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेच्या पटावर नोंद असलेले विद्यार्थी वैध करण्याची कार्यवाही करण्यात येत असून याकरीता प्रत्येक जिल्ह्यामध्ये आधार नोंदणी करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या असून ज्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक नाहीत अशा विद्यार्थ्यांची पडताळणी करुन असे विद्यार्थी संच मान्यतेकरीता ग्राह्य धरण्यासाठी संचालनालयाच्या वतीने दिनांक ७ जून, २०२३ अन्वये आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्या असून ज्या शाळांच्या संच मान्यतेमध्ये त्रुटी आहेत, अशा शाळांच्या संच मान्यता सुधारित करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यामध्ये दिरंगाई करणाऱ्या शाळा/संस्थांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड केवळ संचमान्यता प्रक्रियेसाठी वैध करून वैध विद्यार्थी संख्येच्या आधारे संच मान्यता करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई उपनगर, मुंबई शहर व नागपूर विभागातील विद्यार्थ्यांचे वैध आधार नोंदणीचे प्रमाण हे ८९ टक्के पेक्षा अधिक आहे.

राज्यातील एकूण २,११,०५,५५३ विद्यार्थ्यांपैकी UIDAI कडे १,९४,१८,०५० इतक्या विद्यार्थ्यांचे आधार वैध असून हे प्रमाण ९२ टक्के इतके आहे. सद्य:स्थितीत राज्यात १६,८७,५०३ इतक्या विद्यार्थ्यांचे आधार वैध होणे प्रलंबित आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

विद्यार्थ्यांची आधार नोंदणी किंवा अद्ययावत करण्यासाठी जिल्हा स्तरावर आवश्यक सुविधा दिलेल्या असून विद्यार्थ्यांचे आधार अद्यावत करण्याची कार्यवाही सरल प्रणालीवर सुरू आहे. सन २०२२-२३ च्या संच मान्यतेनुसार दिनांक ३०/११/२०२२ रोजी पटावर असलेल्या विद्यार्थ्यांचे दिनांक १०/११/२०२३ पर्यंत आधार वैधतेची कार्यवाही करण्यात आलेले विद्यार्थ्यांनुसार सन २०२२-२३ च्या

संच मान्यतेकरीता ग्राह्य धरून संच मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये काही तांत्रिक बाबींमुळे दुरूस्तीची आवश्यकता असल्यास दुरूस्तीची कार्यवाही सरल प्रणालीमध्ये करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगाव (जि.जळगाव) येथे वाहनांच्या केलेल्या तपासणीमध्ये लाखो रुपयांचा गुटखा, तंबाखू, पान मसाला व सुगंधित तंबाखू जप्त केल्याबाबत

**(१०) * २१८४१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथे गुटखा विक्री व वाहतुकीविरुध्द अन्न औषध प्रशासन विभागाने मोहीम तीव्र केली असून, सदर मोहिमेंतर्गत मुक्ताईनगर ते बुऱ्हानपूर रोडवरील कामखेडा गावाच्यापुढे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा एकूण २५ लाख १२ हजार ९८० रुपयांचा साठा जप्त केला असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे आहे.
(२) अन्न व औषध प्रशासनाने दिनांक २७/०६/२०२३ रोजी मुक्ताई नगर तालुक्यातील बुऱ्हानपूर मुक्ताईनगर रोड, महाराष्ट्र कारकी चेक पोस्ट जवळ, मुक्ताईनगर, जि.जळगाव येथे एमएच १९ बीएम २३८४ वाहन क्रमांक असलेल्या महिंद्रा पीकअप या वाहनातून प्रतिबंधित पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधितांवर संबंधित पोलीस ठाणे येथे प्रथम खबर अहवाल क्र.०२२७/२०२३ दिनांक २८/०६/२०२३ रोजी दाखल केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागातील अतिरिक्त शिक्षकांचे वेतन बंद करण्याचा विभागीय शिक्षण उपसंचालकांनी घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत

**(११) * २११२९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून मराठवाडा विभागांतर्गत येणाऱ्या पाच जिल्ह्यांतील अतिरिक्त शिक्षकांचे वेतन बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याने शिक्षक वर्गात असंतोष पसरल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयामुळे राज्यातील सर्व अतिरिक्त शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाडा विभागातील अतिरिक्त शिक्षकांचे वेतन बंद करण्याचा विभागीय शिक्षण उपसंचालकांनी घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने शिक्षक व शिक्षकेतर वर्गाची भरती करण्याबाबत

**(१२) * २१५३५ श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सन २०१४ पासून कायमस्वरुपी नोकर भरती न झाल्याने व कंत्राटी पध्दतीने झालेल्या भरतीची मुदत संपत आल्याने शिक्षक व शिक्षकेतर वर्गाची भरती करण्याची मागणी सातत्याने या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने शिक्षक व शिक्षकेतर वर्गाची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकरिता मंजूर असलेल्या शिक्षकीय पदांच्या ८० टक्के म्हणजेच १११ इतकी पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. पदभरती करण्याकरिता आवश्यक असलेली बिंदूनामावली तपासून देण्यात आली आहे. त्यानुसार पदभरतीची पुढील कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. शैक्षणिक गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने अकृषि विद्यापीठातील प्रशासकीय दृष्टीने प्राथम्याने भरावयाच्या शिक्षकेतर पदांचा आढावा घेवून अत्यावश्यक पदे भरण्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही संचालनालयाकडून करण्यात येत आहे.
(३) लागू नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(१३) * २१५१३ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० वर्षांच्या सेवेनंतर आश्वासित प्रगती योजना लागू असताना जिल्हा परिषद आणि खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांना आश्वासन देऊनही तसेच बक्षी समितीने शिफारस केल्यानुसार नवीन सुधारित आश्वासित प्रगती योजना (१०,२०,३०) अद्यापही लागू करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरीता वेगवेगळ्या संघटनांनी व म.राज्य कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, आश्रमशाळा व स्थानिक स्वराज्य संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना बक्षी समितीने केलेल्या शिफारशीनुसार आश्वासित प्रगती योजना (१०,२०,३०) लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बक्षी समितीने १००% अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कार्यान्वित करण्यात यावी, अशी शिफारस केलेली आहे. शिक्षकांबाबत कोणतीही शिफारस केलेली नाही, असे असतानाही, सदर योजना शिक्षकांना लागू करण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. सदर समितीच्या अहवालाच्या आधारे अनुदानित खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासाठीचा मंत्रिमंडळ टिप्पणी वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाच्या खर्चाचे विशेष लेखापरिक्षण करण्याबाबत

**(१४) * २१६४० श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने मागील १२ वर्षांपासून अपूर्णावस्थेत असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासाठी आजपर्यंत ४५०० कोटी रुपये खर्च करुनही वेगवेगळ्या कारणांमुळे रस्त्याचे काम

अपूर्णावस्थेत असल्याने आजपर्यंत झालेल्या खर्चाचे विशेष लेखापरिक्षण करण्यात येईल असा मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घेतलेल्या निर्णयान्वये आजपर्यंत झालेल्या खर्चाचे विशेष लेखापरिक्षण पूर्ण झाले आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर लेखापरिक्षण पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अ) पनवेल कि.मी. ०/०० ते इंदापूर कि.मी. ८४/०० या लांबीसाठी केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एन.एच.ए.आय.) यांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ५४० कोटी इतकी रक्कम दिलेली आहे.

ब) इंदापूर कि.मी.८४/०० ते पात्रादेवी कि.मी. ४७१/३०० या लांबीसाठी राष्ट्रीय महामार्ग विभाग (सा.बां.) यांचेमार्फत एकूण रुपये ३५२७.२५ कोटी इतका खर्च झालेला आहे.

क) सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्प केंद्र शासनाचे रस्ते वाहतूक व महामार्ग, नवी दिल्ली यांचे नियंत्रणाखाली असल्याने सदर रस्त्याच्या कामाचे लेखापरिक्षण हे केंद्र शासनाने नेमणूक केलेल्या लेखापरिक्षक, तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेमार्फत वेळोवेळी करण्यात येते.
(२) वरीलप्रमाणे.
(३) वरीलप्रमाणे.
(४) वरीलप्रमाणे.

-----------------

## विनाअनुदानित ते अनुदानित पदावरील बदलीला स्थगिती देणारा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(१५) * २१३३७ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्वच अनुदानित शाळेतील रिक्त पदांवर विनाअनुदानित पदावर काम करणाऱ्या शिक्षकांना न्याय देणारा बदलीचा निर्णय दिनांक १ एप्रिल २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता, परंतु, या शासन निर्णयावर दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजीच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रकांन्वये विनाअनुदानित ते अनुदानित पदावरील बदलीला पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनाअनुदानित पदावर गेल्या १० ते १२ वर्षांपासून काम करणाऱ्या शिक्षकांवर हा अन्याय झाला असल्यामुळे दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा यासाठी राज्यभरातील शिक्षक संघटनांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजीचा शासन निर्णय रद्द करून १० ते १२ वर्षांपासून विनाअनुदानित पदावर काम करणाऱ्या शिक्षकांवरील अन्याय दूर करून त्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) पदभरती बंदीच्या काळात शिक्षकांचे बदलीबाबत निर्गमित शासन अधिसूचना दिनांक ०८/०६/२०२० व ०१/०४/२०२१ च्या शासन निर्णयामधील तरतूदींचे पालन न होता शिक्षकांची अनुदानित पदावर बदली केली असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असल्याने, दिनांक ०१/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये बदली प्रक्रियेस स्थगिती देऊन आयुक्त (शिक्षण) यांचेकडून याबाबतचा सविस्तर अहवाल शिफारशीसह सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. आयुक्त (शिक्षण) यांचेकडून अहवाल प्राप्त होताच याअनुषंगाने यथोचित निर्णय घेण्यात येईल
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक वितरणव्यवस्थेअंतर्गत एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याबाबत

**(१६) * २२०७१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १९८१२ ला दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना धान्याऐवजी दरमहा १५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानुसार दिनांक १० ऑगस्ट, २०२३ पर्यंत अकोला जिल्ह्यात केवळ २५ हजार ६३ एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांच्या खात्यात ३७ लाख ५९ हजार ४५० रुपये अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली, तथापि, उर्वरित १ लाख २५ हजार ३६४ एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांच्या खात्यात अद्यापही अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना धान्याऐवजी अनुदानाची रक्कम जमा करण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अकोला जिल्ह्यातील उर्वरित १ लाख २५ हजार ३६४ लाभार्थ्यांसह सर्व एपीएल रेशनकार्डधारक लाभार्थ्यांना सदर रक्कम वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) व (४) अकोला जिल्ह्यामधे सद्य:स्थितीत एपीएल शिधापत्रिकाधारकांची एकूण संख्या ३८५८९ असून त्यानुसार एपीएल लाभार्थ्यांची संख्या १५०४२७ आहे. यापैकी ४१९३६ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

उर्वरित पात्र एपीएल शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्यांचा तपशील संकलीत करून, सदर खात्यांची पडताळणी करण्याची व त्यानुषंगाने रोख रक्कम हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अनेक गावांतील शिधापत्रिकाधारकांना रेशनचे धान्य मिळत नसल्याबाबत

**(१७) * २१४३२ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अनेक गावांतील शिधापत्रिकाधारक रेशनवरील धान्यापासून वंचित असल्यामुळे त्यांची उपासमार होऊ लागली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक लाभार्थ्यांचा राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व अंत्योदय योजनेत समावेश असतानाही त्यांच्या रेशनकार्डांची डाटा एन्ट्री नसल्याने त्यांना धान्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अनेक गावांतील शिधापत्रिकाधारकांची राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व अंत्योदय योजनेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने रेशन धान्यापासून वंचित शिधापत्रिकाधारकांना धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही, राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यानुसार शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (RCMS) अंतर्गत राज्यातील नागरीकांच्या शिधापत्रिका संगणकीकृत करण्यात येतात. शिधापत्रिका संगणकीकृत केल्यानंतर शासनाने निर्धारित केलेल्या निकषानुसार पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतर्गत अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत कळमनुरी तालुक्यात ६,२८७ शिधापत्रिकांमधील २५,५७५ पात्र लाभार्थी अंत्योदय अन्न योजनेचा व ३०,०३३ शिधापत्रिकांमधील १,२४,३०४ पात्र लाभार्थी प्राधान्य कुटुंब योजनेचा लाभ घेतात.

(३) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत नविन शिधापत्रिकाधारकांचा समावेश करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयाकडून चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेरला (ता.पवनी, जि.भंडारा) जिल्हा परिषद शाळेमध्ये शालेय पोषण आहारातंर्गत निकृष्ट दर्जाचे अन्न पुरविण्यात आल्याबाबत

**(१८) * २२५४३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरला (ता.पवनी, जि.भंडारा) जिल्हा परिषद शाळेमध्ये शालेय विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा शालेय पोषण आहार पुरविण्यात येत असल्याने शाळेतील २५५ विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत दिल्या जाणाऱ्या जेवणामध्ये किडे आढळून येत असल्याच्या तक्रारी मुख्याध्यापिका व स्वयंपाकी यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद शाळेत केंद्र प्रमुख तथा वरिष्ठ श्रेणी मुख्याध्यापिका व शालेय व्यवस्थापन समितीने सदर शाळेत देण्यात येणाऱ्या पोषण आहाराची पाहणी केली असता जेवणात किडे आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नेरला जिल्हा परिषद शाळेमध्ये निकृष्ट दर्जाचा शालेय पोषण आहार देणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, नेरला ता.पवनी, जि.भंडारा येथे शालेय पोषण आहार योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाचा आहार दिल्याबाबतची बातमी दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका यांना निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मिरगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील दुध भेसळ रोखण्याबाबत

**(१९) * २१४०० श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १९७९१ ला दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच मिरगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील दूध संकलन केंद्रामध्ये कपडे धुण्यासाठी वापरण्यात येणारा कॉस्टिक सोडा आणि मिल्की लिस्ट या रासायनिक पावडरच्या मिश्रणातून बनावट दूध बनविले जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये दूध भेसळ करणाऱ्या अनेक टोळया कार्यरत असून, भेसळयुक्त दुधाचा वापर मिठाई बनविण्यासाठी, दैनंदिन वापरासाठी केल्याने व भेसळयुक्त दुध घेतल्यामुळे नागरिकांचे विशेषत: बालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात तसेच मिरगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील दूध संकलन केंद्रामध्ये करण्यात येणाऱ्या दुध भेसळ प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने दुध भेसळ करणाऱ्या सबंधित दोषींवर दूध भेसळ रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांचे विशेष पथक, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नाशिक तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय दूध व दुग्धजन्य पदार्थ भेसळ प्रतिबंधक समिती यांच्यासोबत अन्न व औषध प्रशासनाच्या नाशिक कार्यालयाने मे. ओम सदगुरू दुध संकलन व शितकरण केंद्र मिरगाव, पो. शहा, ता.सिन्नर, जि.नाशिक व मे. व्हीआरएस इंटरप्रायजेस, उजनी, पो. दहीवाडी, ता.सिन्नर, जि.नाशिक या आस्थापनेची तपासणी दिनांक ०२/०९/२०२३ रोजी केली.

मे. ओम सदगुरू दुध संकलन व शितकरण केंद्र मिरगाव, पो. शहा, ता.सिन्नर, जि.नाशिक या आस्थापनाकडे आढळून आलेल्या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. सदर आस्थापनाने खरेदी केलेल्या अन्न पदार्थांचा कोणताही तपशील आढळून न आल्यामुळे व अन्नपदार्थ भेसळयुक्त असल्याच्या संशयावरून सदर साठा जप्त करून नष्ट करण्यात आला आहे. तसेच मे. व्हीआरएस इंटरप्रायजेस, उजनी, पो. दहीवाडी, ता.सिन्नर, जि.नाशिक या अन्न आस्थापनाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत परवाना घेतला नसल्याचे आढळून आले.

त्यामुळे, उपरोक्त दोनही आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात येवून त्यांच्याविरुध्द वावी पोलीस स्टेशन, ता.सिन्नर, जि.नाशिक येथे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत प्रथम खबरी अहवाल क्र.३७०/२०२३, दिनांक ०२/०९/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर दोनही आस्थापनेतून विश्लेषणासाठी घेतलले अन्न नमुने प्रमाणित असल्याचा अहवाल जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांनी सादर केला आहे. गाईचे दुध या अन्न पदार्थांचा विश्लेषण अहवाल प्रमाणित असल्याचा अहवाल जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांनी सादर केला असला तरी, सदर अन्न नमुना फेरविश्लेषणासाठी रेफरल अन्न चाचणी प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आला आहे. सदर अन्न नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्राप्त होताच त्यानुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल.

राज्यात अन्य ठिकाणी दुध या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येत असून कमी दर्जाचे व असुरक्षित अन्न नमुन्यांच्या अनुषंगाने मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शाळा व वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२०) * २१६५२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २ हजार ५६६ शाळा असून, यामध्ये प्राथमिक शाळांपैकी ४५५ शाळांची आणि ८०३ वर्ग खोल्यांची दुरवस्था झाली असून एकूण ३१० शाळा जीर्ण झाल्या असल्याचे शिक्षण विभागाच्या दप्तरी नोंद झाली असून काही शाळांमधील ५३७ वर्ग खोल्यांची देखील दुरवस्था झाल्यामुळे या वर्गांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देणे अत्यंत अडचणीचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शाळांची आणि वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्यासाठी २० कोटी ८२ लाख ६४ हजार रुपयांचा निधी जिल्हा परिषदेला अद्याप प्राप्त झालेला नसल्याने, दुरवस्था झालेल्या शाळांची नव्याने निर्मिती करण्यासाठी जिल्हा नियोजन विभागामार्फत येणाऱ्या निधीवर अवलंबून राहावे लागणार आहे तसेच ३१० शाळा आणि ५३७ वर्ग खोल्या उभारण्यासाठी ७६ कोटी ६६ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळांच्या दुरुस्तीसाठी व नव्याने निर्मिती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.

वर्गखोल्या धोकादायक झालेल्या शाळांत उर्वरीत सुस्थितीतील वर्गखोल्या व अन्य इमारतीमध्ये वर्ग भरविले जात आहेत

(२) अंशत: खरे आहे.

(३) शासन व जिल्हा परिषदेकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा परिषद सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, १५ वा वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड व समग्र शिक्षा अभियान इत्यादींमधुन वर्गखोली दुरूस्तीची/ बांधकामांची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाडगाव (जि.जळगाव) येथील बोदवड रेल्वे स्टेशन जवळील उड्डाण पुलावरील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२१) * २१८६५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाडगाव (जि.जळगाव) येथील बोदवड रेल्वे स्टेशन जवळ असलेल्या उड्डाण पूल रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून सदर बांधकामाची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर उडडाण पूल रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषी ठेकेदारांवर कोणती कारवाई केली तसेच सदर उड्डाण पुलाच्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) निवेदन प्राप्त आहे.
(२) सदर कामाबाबत अधीक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांचे कडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी कार्यवाही करणे बाबत सूचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत सुमारे १८६ अनधिकृत शाळा सुरु असल्याबाबत

**(२२) * २१६८३ श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १९५७४ ला दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत सुमारे १८६ शाळा अनधिकृत असून त्यांचेवर नियमानुसार कारवाई करत असतानाही शासनाने ही कारवाई स्थगित केल्यामुळे सर्व शाळा सर्रासपणे सुरु असल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनधिकृत शाळा अद्यापही सुरु राहण्यामागे शिक्षणाधिकारी व संबंधित अधिकारी जबाबदार असल्याचे शिक्षक व पालक संघाने तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने उक्त अनधिकृत सुरु असणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) या स्वरूपाची तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील एकूण १८६ अनधिकृत शाळांपैकी १४ शाळा बंद करण्यात आल्या असून उर्वरित १७२ शाळांबाबतची तपासणी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मोठ्या व्यापाऱ्यांकडून जीवनावश्यक वस्तुंची करण्यात येणारी साठवणूक रोखण्याकरीता उपाययोजना कारण्याबाबत

**(२३) * २१४०१ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत २ ते ४ महिन्यांमध्ये गहू, तांदूळ, तुरडाळ, इ. धान्य, कडधान्य, भाजीपाला आणि किराणा वस्तूंच्या किंमतीत तसेच खाद्यपदार्थांच्या किंमतीत १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दरवाढीला मोठ्या व्यापाऱ्यांकडून करण्यात येणारी साठवणूक हे मुख्य कारण असून शासनाने त्यांचा माल जप्त करावा व सर्व जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण आणावे अशी नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील मोठ्या व्यापाऱ्यांकडून जीवनावश्यक वस्तूंची करण्यात येणारी साठवणूक रोखण्याबाबत तसेच सदर वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण ठेऊन महागाई कमी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशतः खरे आहे.

(२) या संदर्भात निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण राहवे यासाठी केंद्र शासनाच्या दिनांक १२ जून, २०२३ व दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये गव्हाच्या घाऊक/किरकोळ व्यापारी तसेच मिलर्स /इम्पोटर्सकरीता साठा निर्बंध दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत लागू करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या दिनांक ०२ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचने नुसार तूर व उडद डाळींचे घाऊक / किरकोळ व्यापारी तसेच मिलर्स / इम्पोटर्सकरीता दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत लागू साठा निर्बंध लागू करण्यात आले होते. आता केंद्र शासनाच्या दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये सदरचे साठा निर्बंध दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत लागू करण्यात आले आहेत. तसेच, साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्याच्या संबंधित यंत्रणांना सुचना देण्यात आल्या असून, केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्देशानुसार राज्य शासनाच्या पुरवठा यंत्रणेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यात येणाऱ्या “आनंदाचा शिधा” मध्ये परदेशातून आयात केलेले पामतेल दिले जाणार असल्याबाबत

**(२४) * २१७६९ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दसरा-दिवाळी निमित्त वितरित करण्यात येणाऱ्या "आनंदाचा शिधा" मध्ये परदेशातून आयात केलेले पामतेल दिले जाणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि राजस्थान शासनाकडून सोयाबीनची विक्री हमीभावापेक्षा कमी भावाने होत असल्यामुळे सोयाबीनचे भाव स्थिर होण्यास मदत व्हावी, याकरीता तेथील शिधापत्रिकाधारकांना सोयाबीनचे तेल पुरविले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देशातील वस्तूला प्रोत्साहन देण्याची गरज असतानाही शासनाने परदेशातून आयात केलेले पामतेल शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधामध्ये वितरीत करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) नियुक्त पुरवठादार यांच्याकडून आनंदाचा शिधा अंतर्गत पामतेलाचा पुरवठा करण्यात आला आहे.
(२) विभागाकडे याबाबतची माहिती उपलब्ध नाही.
(३) यापुर्वी दिवाळी-२०२२ व गुढीपाडवा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. सणांनिमित्त व गौरी-गणपती उत्सवानिमित्त वितरित करण्यात आलेल्या "आनंदाचा शिधा" शिधाजिन्नस संचांमध्ये पामतेल या शिधाजिन्नसाचा समावेश करण्यात आला होता.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.